## समग्र शिक्षा अभियान, जिल्हा परिषद परभणी.
## कंत्राटी पध्दतीने शिक्षकेत्तर कर्मचारी पदभरती जाहिरात

समग्र शिक्षा अभियान अंतर्गत कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय मुलींचे वस्तीगृह, जिल्हा परिषद परभणी अंतर्गत परभणी, जिंतुर, सेलु, पुर्णा, पाथरी, मानवत व गंगाखेड या तालुक्यात प्रत्येकी एक कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय ही शााळाबाहय मुलींची निवासी शाळा सुरु करण्यात आलेली असुन सदर शाळेसाठी (1) शासन निर्णय क्रमांक सशिअ/2008/प्र.क्र.316/प्राशि/04 शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय मुंबई दिनांक 27/05/2008 (2) 1) शासन निर्णय क्रमांक मॉडेल स्कूल-2011/142/11)/माशि-7 दि.20/01/2012 (3) राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, मुंबई यांचे पत्र क्र.687 दि.04/07/2018 (4) राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, मुंबई यांचे पत्र क्र.933 दि.12/09/2018 व (5) राज्य प्रकल्प संचालक, म.प्रा.शि.प.,मुंबई यांचे पत्र क्र.2860 दि.05/11/2018 अन्वये खालिल विवरणानुसार संपुर्णतः तात्पुरत्या स्वरूपाची रिक्त पदे करार पध्दतीने एकत्रित पारिश्रमिकावर भरावयाची आहेत.

सरळ सेवा भरतीसाठी विहित शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता पुर्ण करणा-या उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक उमेदवारानी आपले अर्ज **दिनांक 14.01.2019** पर्यंत कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळुन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) सर्व शिक्षा अभियान कार्यालय, प्रशासकीय इमारतीच्या बाजुला शिवाजी नगर, परभणी या पत्यावर प्रत्यक्ष अथवा पोष्टाने सादर करावेत. विलंबाने आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

| **अ .क्र** | **पदाचे नावं** | **पद संख्या** | **शैक्षणिक अर्हता व अनुभव** | **मासिक पारिश्रमिक रु.** |
|---|---|---|---|---|
| 1 | गृहप्रमुख (फक्त महिलांसाठी) | 07 | कोणत्याही शाखेची पदवी+BSW किंवा MSW + MSCIT व दोन वर्षाचा गृहप्रमुख म्हणून अनुभव असल्यास प्राधान्य | 25000/- |
| 2 | लेखापाल नि सहाय्यक (फक्त महिलांसाठी) | 07 | कोणत्याही शाखेचा पदवीधर + MSCIT + Typing Marathi 30 wpm & English 40 wpm | 15000/ |
| 3 | चौकीदार | 21 | सेनादल, पोलीसदलातून निवृत्त झालेले माजी सैनिक अथवा माजी पोलीस, ते उपलब्ध नसल्यास सुरक्षा विषयक प्रशिक्षण झालेल्या व्यक्ती (पुरूष) | 9000/- |
| 4 | मुख्य स्वयंपाकी (फक्त महिलांसाठी) | 07 | 7 वी पास व स्वयंपाकी या पदाचा अनुभव (दोन वर्ष), होंम सायन्स मधील पदविका असल्यास प्राधान्य | 10000/- |
| 5 | सहाय्यक स्वयंपाकी (फक्त महिलांसाठी) | 14 | 7 वी पास व स्वयंपाकी या पदाचा अनुभव (एक वर्ष) | 9000/- |

**(चौकीदार वगळता इतर सर्व पदे महिला उमेदवारांसाठी राखीव आहेत)**

# रिक्त पदांचा आरक्षण तक्ता

| अ. क्र | पदाचे नाव | अनु. जाती | अनु जमाती | विमुक्त जाती (अ) भटक्या जमाती (ब), (क), (ड) अंतर्गत परिवर्तनिय आहेत | एस. ई बी सी. | विशेष मागास प्रवर्ग | इतर मागास प्रवर्ग | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | गृहप्रमुख | 1 | 0 | 1 | 1 | 0 | 1 | 3 | **7** |
| 2 | लेखापाल नि सहाय्यक | 1 | 0 | 1 | 1 | 0 | 1 | 3 | **7** |
| 3 | मुख्य स्वयंपाकी | 1 | 0 | 1 | 1 | 0 | 1 | 3 | **7** |
| 4 | सहा.स्वयंपाकी | 2 | 1 | 2 | 2 | 0 | 2 | 5 | **14** |
| 5 | चौकीदार | 3 | 2 | 2 | 3 | 0 | 4 | 7 | **21** |
| **एकूण** | | **8** | **3** | **7** | **8** | **0** | **9** | **21** | **56** |

**उपरोक्त दर्शविलेले पदे खालील बाबींच्या आधिन राहून भरण्यात येतील.**

वरिल अ.क्र. 1,2,3 व 4 ही पदे महिला उमेदवारासाठी आरक्षीत आहे.

पाथरी व जिंतूर येथील वसतीगृहाचे बांधकाम न झाल्यामुळे मा. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांचे पत्र क्र. 687/2018 दिनांक 4 जुलै 2018 नुसार जिल्ह्यातील गंगाखेड, मानवत, परभणी, पुर्णा व सेलू या पाच ठिकाणीची पदे सध्या भरावीत असे निर्देश आहेत. त्यानुसार सदर जाहीराती मधिल पदभरतीनुसार प्रत्यक्ष नियुक्ती देताना सदर दोन वसतीगृहासाठी मंजुर असलेल्या जागा सध्या भरण्यात येणार नाहीत. सदर दोन विद्यालयासाठी केवळ प्रतिक्षायादी तयार करण्यात येईल. प्रत्यक्ष पदे भरताना पाच विद्यालयासाठी मंजुर होणा-या पदसंख्येनुसार, सामाजिक आरक्षणानप्रमाणे मंजुर होणा-या संख्येप्रमाणे नियुक्ती आदेश देण्या येतील. एकूण सात विद्यालयासाठी तयार करण्यात येणा-या निवड सूची मधिल शेवटचे उमेदवार प्रतिक्षा सूचीमध्ये ठेवण्यात येतील.

जाहिरातीत नमुद सर्व पदासाठी उमेदवाराचे **वय दिनांक 01.01.2019** या दिनांकास 18 वर्षापेक्षा कमी नसावे. खुल्या प्रवर्गातील उमेदवाराचे कमाल वय 38 वर्ष व मागासवर्गीय उमेदवारासाठी 43 वर्षापेक्षा जास्त नसावे.

उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

उमेदवाराने दिलेल्या विहित नमुन्यात अर्ज सादर करावा. अर्जावर विहित ठिकाणी अलीकडच्या काळातील एक पासपोर्ट साईज फोटो लावावा व त्यावर स्वत: स्वाक्षरी करावी.

एक पेक्षा जास्त पदाकरिता अर्ज करावयाचे असल्यास उमेदवाराने प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा.

उमेदवाराने ज्या राखीव प्रवर्गासाठी अर्ज केला आहे. त्याचे जात प्रमाणपत्राची सत्यप्रत अर्जा सोबत सादर करावी.

आवेदन पत्रासोबत खुल्या प्रवर्गातील उमेदवारानी रु. 400/- चा व मागासवर्गीय उमेदवारांनी रु.200/ चा (KGBV-SSA MPSP PARBHANI) या नावे परभणी येथे देय असलेला राष्ट्रीयकृत बॅकेचा धनाकर्ष (डी.डी.) अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे.

अनुभव प्रमाणपत्र जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी प्रतिस्वाक्षरी केलेले असावे. प्रतीस्वाक्षरी नसलेले प्रमाणपत्र ग्राहय धरल्या जाणार नाहीत.

सदरचा अनुभव हा व्यासायिक पात्रता उत्तीर्ण नंतरचा अनुभव असणे आवश्यक आहे. व्यवसायीक पात्रता उत्तीर्ण पुर्वीचा अनुभव ग्राहय धरल्या जाणार नाही.

उमेदवाराने आवेदन पत्रासोबत आवश्यतेनुसार शैक्षणीक अर्हता व अनुभवाचे प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती जोडाव्यात.

उमेदवाराने आपले अर्ज ए4 साईज कागदावर सोबतच्या विहीत नमुन्यात संगणकीकृत / टंक लिखीत करुन सादर करावेत.

`सदरची पदे कंत्राटी व तात्पुरत्या स्वरूपाची असुन निवड झालेल्या उमेदवारांना कंत्राटी पध्दतीने सहा महिणे कालावधीसाठी नियुक्ती आदेश देण्यात येतील.सदरची पदे ही कदापीही कायम होणार नाहीत. सदर पदावर नियुक्ती मिळाल्यानंतर कायम करण्यासाठी कोणताही दावा उमेदवारास करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

अपुर्ण, विहीत नमुन्यात नसलेले व आवश्यक कागदपत्रे सोबत न जोडलेले अर्ज नाकारण्यात येतील.

वि.जा.अ, भ.ज.ब.भ.ज.क. व भ.ज.ड हे आरक्षित प्रवर्ग आंतरपरिवर्तनिय असून संबधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास शासन निर्णयाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवारांचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

पोष्टाने झालेल्या विलंबासाठी हे कार्यालय जबाबदार राहणार नाही व त्याबाबत कोणतीही तक्रार ग्राह्य धरण्यात येणार नाही.

सामाजिक, समातंर आरक्षणात बदल करण्याचे सर्व अधिकार खालील निम्न स्वाक्षरीकार यांनी राखुन ठेवले आहेत.

**निवड पद्धत :-**सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दि. 19-10-2007 मधिल परिच्छेद 6.2 नुसार ज्या पद्धती करिता किमान पदवी ही कमीत कमी अर्हता आहे अशा पदाकरिता परिक्षेचा दर्जा राज्यातील मान्यता प्राप्त विद्यापीठांच्या पदवी परिक्षेच्या दर्जा समान राहील. परंतु मराठी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता 12 वी ) च्या दर्जाच्या समान राहील. व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौद्धिक चाचणी या विषयावरील प्रश्नांकरिता प्रत्येकी 50 गुण ठेवून एकूण 200 गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल.

आवश्यकता भासल्यास लेखापाल नि सहाय्यक या पदाची टायपीग परीक्षा घेण्यात येईल.

परीक्षेचा निकाल तयार करताना ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम सामान्य प्रसासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रनिमं/1215(प्रक्र 55/15) /13 अ दि. 5-10-2015 मधिल निकषावर लावला जाईल.

जाहीरातीत दिलेल्या पदाची संख्या कमी आथवा जास्त होऊ शकते.त्यामुळे सामाजिक व समांतर आरक्षणाच्या पदामध्ये बदल होऊ शकतो त्या बाबत सर्व अधिकार अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी परभणी यांनी राखुन ठेवले आहेत.

परीक्षेचा निकाल तयार करताना ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम सामान्य प्रसासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रनिमं/1215(प्रक्र 55/15) /13 अ दि. 5-10-2015 मधिल निकषावर लावला जाईल.

शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही 2017/प्रक्र 31/98*16-अ दि. 16 मार्च 1999 तसेच शासन परिपत्रक क्र. एस.आर.व्ही. 2012 प्रक्र 16/12/16-अ दि. 13 ऑगस्ट 2014 मधिल तरतुदीनुसार समांतर आरक्षण कार्यान्वित करण्यासाठी विहित केलेली कार्यपद्धती अनुसरली जाईल.

महिलांच्या आरक्षणाबाबत शासन निर्णय महिला व बाल कल्याण विभाग क्र. 82/2001 / मसेआ00 / प्र.क्र. 415/का-2/दि. 25 मे 2001 मधिल तरतुदीनुसार खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांना सदर शासन निर्णयात परिशिष्ट -3 मध्ये दिलेल्या खुल्या प्रवर्गातील उन्नत व्यक्ती / गट /क्रिमिलेअर) यामध्ये मोडत नसल्याचे सक्षम अधिका-याचे कागदपत्र तपासणीचे दिनांकास वैध असलेले नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

सामान्य प्रशासन अधिसूचना क्र. एसआरव्ही-2000 प्र.क्र. (17/2000)12 दि. 28 मार्च 2005 व सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. / प्र.क्र. 17/2000/12 दि. 1 जुलै 2005 नुसार लहान कुटुंब असल्याचे विहित नमुण्यातील प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. (अविवाहित उमेदवारानी सुद्धा लागु नाही असे नमुद करणे आवश्यक आहे. )

सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. बीसीसी 2011 प्रक्र1065/2011 / 16-ब दि. 12 डिसेंबर 2011 नुसार मागास प्रवर्गाच्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाच्या दिनां्कापासून सहा महिण्याचे आत सादर करण्याच्या अटीवर व मा.

सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाचे अधिन राहून नियुक्ती दिली जाईल. सहा महिण्याचे आत जात वैघता प्रमाणपत्रासाठी परिपुर्ण प्रस्ताव कार्यालयामार्फत समितीकडे सादर करुन जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास कोणतीही नोटीस न देता सेवा समाप्त करण्यात येईल.

निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती किंवा कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास किंवा त्याचे पुर्व चरित्र बरोबर नसल्याचे आढळल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी / नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर रद्द करण्यात येईल किंवा नियुक्ती दिल्यानंतर निदर्शनास आल्यास त्याची नियुक्ती रद्द करण्यात येईल व त्यानंतर त्याबाबत उमेदवाराची कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकूण घेतली जाणार नाही.

या जाहीरातीतील नमुद केलेल्या पदावर उमेदवाराची निवड न्यायालयीन निर्णय शासनाच्या विविध विभागाचे शासन निर्णय व परिपत्रके यातील निर्देशाच्या अधिन असेल.

उमेदवार हा महाराष्ट्रातील मुळ रहिवासी असावा उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असल्याने डोमिसीअल प्रमाणपत्र प्राधिकृत अधिका-याकडून घेतलेले असावे.अधिवास प्रमाणपत्र नसल्यास महाराष्ट्रातील जन्माचा दाखला सादर करणे बंधनकारक राहील. उपरोक्त बाबत शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

निवडीबाबत सर्व अधिकार अध्यक्ष कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय तथा जिल्हाधिकारी परभणी यांनी राखुन ठेवले आहेत.

जाहीरातीत दिलेल्या पदाची संख्या कमी आथवा जास्त होऊ शकते.त्यामुळे सामाजिक व समांतर आरक्षणाच्या पदामध्ये बदल होऊ शकतो त्या बाबत सर्व अधिकार अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी परभणी यांनी राखुन ठेवले आहेत.

| | | |
|---|---|---|
| **स्वाक्षरीत** | **स्वाक्षरीत** | **स्वाक्षरीत** |
| **सदस्य सचिव** | **सहअध्यक्ष** | **अध्यक्ष** |
| **जिल्हा निवड समिती तथा** | **जिल्हा निवड समिती तथा** | **जिल्हा निवड समिती तथा** |
| **शिक्षणाधिकारी (प्रा)** | **मुख्य कार्यकारी अधिकारी** | **जिल्हा परिषद परभणी** |
| **जिल्हाधिकारी परभणी** | **जिल्हा परिषद परभणी** | |

# समग्र शिक्षा अभियान, जिल्हा परिषद, परभणी
## कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील पदासाठी आवेदनपत्राचा नमुना

अर्जाचा आवक क्र. [ ] अर्ज केलेल्या जातीचा प्रवर्ग:- [ ]

प्रति,

सदस्य सचिव,
जिल्हा निवड समिती तथा
शिक्षणाधिकारी (प्रा)
जिल्हा परिषद परभणी

उमेदवाराचे अलिकडच्या काळातील पासपोर्ट फोटो

विषय:-.................................................. पदा करीता विनंती अर्ज.

1. उमेदवाराचे संपुर्ण नांव:- ........................ ........................... ................................
2. पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता:-........................................................................................
   ........................................................................................
   दुरध्वनी क्रमांक व मोबाईल क्र: -........................................................................
3. कायमचा संपुर्ण पत्ता:-........................................................................................
   ........................................................................................
   दुरध्वनी क्रमांक व मोबाईल क्र: -........................................................................
4. जन्म दिनांक (अंकात)............................ अक्षरी....................................................
5. दिनांक 01/01/2019 रोजीचे वय ............ वर्ष ........... महिने .......... दिवस..........
6. जातीचे नाव .................. जातीचा प्रवर्ग ....................लिंग........
   (SC-1, ST-2, VJNT-3, NT(B)-4, NT(C)-5, NT(D)-6, OBC-7, SEBC-8, OPEN-9)
7. शैक्षणिक / व्यावसायिक अर्हता (तांत्रीक शिक्षणासह)

| अ.क्र | परिक्षेचे नाव | बोर्ड / विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष / महिना | एकूण गुण | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

8. **अनुभवाचा तपशिल:-**

| अ.क्र | कार्यालयाचे /संस्थेचे नाव | पदाचे नाव | सेवा कालावधी | | एकूण सेवा | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासुन | पर्यंत | वर्ष | महिना | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

9. अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी आहे काय? होय / नाही

10. अर्जदार माजी सैनिक आहे काय? होय / नाही

11. राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष: -धनाकर्ष क्रमांकः-...................... रक्कम रुपये:-...................

(खुला प्रवर्ग 400/- रु व मागास प्रवर्ग 200/-रु)बॅकेचे नांवः-.....................................दिनांकः-..................

वर नमुद केलेली माहिती खरी व बरोबर आहे या पदसाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा मी धारण करीत आहे. याची खात्री करुनच मी हा अर्ज करीत आहे. मी आणखी असे प्रमाणित करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे मला मिळालेली नौकरी गमावण्यास मी पात्र राहील. तसेच माझ्या विरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची मला जाणीव आहे. त्यावर माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

**ठिकाण: -.......................**

**दिनांकः- / /20**

**(उमेदवाराचे संपुर्ण नाव व स्वाक्षरी)**

**सोबत जोडलेली कागदपत्राची यादी:-**

1.................................................... 2....................................................

3.................................................... 4....................................................

5.................................................... 6....................................................

7.................................................... 8....................................................

9.................................................... 10....................................................